नियमीत दिवाणी दावा क्र.५४/२०१६
भागीरथीबाई वि. मंचक

४ **वादी तर्फे सा.क्र.४**
**(नि.क्र.८८)**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्रं.१ तर्फे श्री.आर.ई.भुरकापल्ले वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**६.** माझी पत्नी गुट्टेवाडी गावची सरपंच आहे. बाबुराव चाटे हे किनगाव येथील गृहस्थ ग्रामपंचायत समिती सदस्य होते. हे खरे की, बाबुराव चाटे हे माझे मित्र आहेत. हे खरे की, माझे वडील शिवाजी, आजोबा विश्वनाथ व चुलते रामराव हे किनगाव परिसरातील सर्वपरिचीत व्यक्तीमत्व आहे. हे तिघेही किनगाव परिसरात लोकांना पैसे देत घेत असत याबद्दल मला माहिती नाही.

**७.** सर्वे क्रं. २६१/३/४ मध्ये कोणते क्षेत्र कोणाला विकले याबद्दल मला माहिती नाही. हे खरे की, वादी हिचे पत्र्याचे शेड विक्री करुन शिल्लक राहिलेल्या जमीनीवर आहे.

८. मी ज्ञानोबा नागनाथ चाटे यांना ओळखतो. हे खरे की, त्यांची व माझी भावकी नाही. त्यांच्याविरुध्द माझा किंवा आमच्या दोघात कुठलाही दावा झालेला नाही हे खरे आहे. मंचक बोंडगे यांच्यातील खरेदीपत्र मी पाहिलेले नाही. हे खरे की, त्या खरेदीपत्रात काय लिहीले आहे हे मला माहिती नाही. व्यंकट सिरसाठ यांच्याकडून मी सर्वे क्रं. २६१/३/४ मधील प्लॉट खरेदी घेतला असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. हे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्रं.२ तर्फे श्री.उप्पे वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**९.** मी प्रतिवादींच्या खरेदीपत्रावर साक्षीदार नाही. हे खरे की, प्रतिवदी क्रं. १ ने प्रतिवादी क्रं. २ ला लिहून दिलेल्या पत्रातील मजकूर मला माहिती नाही. माझे शेजारी लक्ष्मण चाटे यांचा मी घेतलेल्या प्लॉट खरेदीच्या दिवसापासून शेजारील जमीनीवर कब्जा आहे त्यामुळे प्रतिवादींचा जमीनीशी संबंध नाही असे मी सांगतो. वादीने लोकांना विक्री करुन शिल्लक राहिलेल्या जमीनीवर तिचा कब्जा आहे हे म्हणणे खरे आहे. माझ्या मालकीहक्काबद्दलचा पुरावा मी शपथपत्राबरोबर दिलेला नाही हे म्हणणे खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/-**
(एस.एन.सरडे)

दिनांक ०४/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.